## रेग्युलर दिवाणी दावा क्रमांक ८८/२०१७ मधील निशाणी क्रमांक १२ वर आदेश

**०१.** या कामी प्रतिवादींनी (नि.क्रं.१२) प्रतिदावा केला आहे की, मौजे लोळाणे येथील गट नंबर १९५ पूर्वीचा सव्हे नंबर ५७/१० हा त्यांच्या मालकी व वहिवाटीस आहे. मा.जिल्हाधिकारी, विशेष भुमीसंपादन अधिकारी, कोल्हापूर यांच्यामार्फत १९९५ साली प्रतिवादीच्या मालकीची एकूण ५७ आर जमीन संपादीत केली. हे क्षेत्र संपादीत करताना प्रतिवादीच्या एकूण क्षेत्राच्या हिशोबात त्यांनी गट नंबर १९५ हा प्रतिवादींचा असल्याचे गृहीत धरले होते. प्रतिवादीनी गट नंबर १९५ वर सहकारी सोसायटीचे कर्जही काढले आहे. सव्हे नंबर ५७/४ चे क्षेत्र ४ गुंठे आहे. सव्हे नंबर ५७/४ चा नविन गट नंबर १९५ नाही. म्हणून त्यांनी प्रतिवादीच्या गट नंबर १९५ मौजे लोळाणे या जमिनीमधील प्रतिवादींच्या शांततामध्ये कब्जे वहिवाटीस वादींनी हरकत अडथळा करु नये अशी तुर्तातुर्त मनाई मागितली आहे.

**०२.** वादींनी या कामी आपले म्हणणे नि.क्रं.१७ ला दाखल केले आहे. त्यांनी कथन केले की वादीचे वडील शंकर भिवा पाटील यांनी दिनांक १२.१२.१९५३ साली दावा मिळकत खरेदी केली. सव्हे नंबर ५७/४ शी प्रतिवादीचा कोणताही हक्कसंबंध नाही. एकत्रीकरणाचेवेळी झालेल्या चुकीमुळे प्रतिवादींचे नाव बेकायदेशिररित्या लागले आहे. म्हणून त्यांनी विनंती केली की प्रतिवादीचा अर्ज नामंजूर करण्यात यावा.

**०३.** प्रतिवादींचा अर्ज, वादींचे म्हणणे व दोन्ही विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकता माझ्या विचारार्थी खालील मुददे निघतात. त्यावरील माझा निष्कर्ष कारणेमिमांसेसह खालीलप्रमाणे नमूद करत आहे.

| अ.क्रं. | विचाराथी निघालेले मुददे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १... | प्रतिवादींनी प्रथमदर्शनी प्रकरण शाबीत केले आहे काय ? | ... नाही .. |
| २... | तुर्तातुर्त मनाई आदेश न मिळाल्यास प्रतिवादींचे अपरिमित नुकसान होईल काय ? | ... नाही .. |
| ३ | न्यायाचा समतोल प्रतिवादींच्या बाजूने आहे काय ? | ... नाही .. |
| ४ | काय आदेश ? | अर्ज नामंजूर करण्यात येत आहे. |

## कारणेमिमांसा

**मुददे क्रमांक १ ते ४ करीता –**

**०४.** प्रतिवादींनी आपल्या कथनाला दुजोरा देण्यासाठी मौजे लोळाणे येथील सव्हे नंबर ५७/१० चा एकत्रीकरणाचा उतारा हजर केला आहे. तसेच त्यांनी यादी क्रमांक २३/४ ला सव्हे नंबर ५७/४ चा एकत्रीकरणाचा उतारा हजर केला आहे. त्यामध्ये तुकाराम सखाराम पाटील यांचा १/३ हिस्सा शंकर भिवा पाटील (वादीचे वडील ) यांचा २/३ हिस्सा असल्याचे दिसून येते. त्यामध्ये सव्हे नंबर ५७/४ चे क्षेत्र ४ गुंठे असल्याचे दिसते.

**०५.** याउलट वादींनी मौजे लोळाणे सव्हे नंबर ५७/४ चे स्वतःचे नावचे खरेदीखत नि.क्रं.१८/१ ला हजर केले आहे. वादींनी खरेदी केलेले सव्हे नंबर ५७/४ चे क्षेत्र २ एकर ३७ गुंठे आहे. प्रतिवादींनी हजर केलेल्या महसुलाच्या कागदपत्रापेक्षा वादींनी हजर केलेले नोंदणीकृत खरेदीखत वरचढ ठरते. १९५३ नंतर एकत्रीकरण योजनेपर्यंत सव्हे नंबर ५७/४ चे क्षेत्र २ एकर ३७ गुंठे वादीच्या नावे दिसून येते. तसेच वादीने फेरफार क्रमांक ४५३ मौजे लोळाणे हजर करुन सिध्द केले की सव्हे नंबर ५७ चे नउ हिस्से पाडले होते. त्यामध्ये ५७/४ हा हिस्सा वादींचा होता. तसेच वादींनी नि.क्रं.२२/२ वर सव्हे नंबर ५७ चे नंतर एकूण १५ हिस्सा पडल्याचे व सव्हे नंबर ५७/१० ला शंकर भिवा पाटील (वादींचे पूर्वहक्कदार) यांचे नाव २ एकर ३७ गुंठे क्षेत्राला लागले असल्याचे सिध्द केले. वादींनी याकामी दावामिळकतीमधील सन २०१०,

२०१३, २०१६ सालचे ऊसपिक आपल्या नावे कारखान्याला गेल्याच्या पावत्या हजर करुन सिध्द केले.

**६.** प्रतिवादींनी प्रथमदर्शनी केस सिध्द केली नाही. उलट वादीनेच दावा मिळकतीमध्ये आपली मालकी व ताबा सिध्द केला. दावा मिळकतीमध्ये प्रतिवादींचा ताबा नसल्यामुळे त्यांचे अपरिमित असे नुकसान होत नाही. दाव्याचा कल वादींच्या बाजूने आहे प्रतिवादींच्या बाजूने नाही. परिणामी मी मुददे क्रमांक १ ते ३ चे उत्तर नकारार्थी देत आहे व मुददा क्रमांक ४ साठी खालील आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

**०१.** अर्ज नामंजूर करण्यात येतो.

**०२.** खर्चाचा आदेश दाव्यासोबत.

सही/-
(अ.अ.वाळूजकर )
दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
मलकापूर-शाहुवाडी

दिनांक – ०६/०३/२०१८

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. File order are same, word to word, as per the original order.

Name of the Stenographer : S.A.SHINDE
Name of the Court : A.A.Walujkar, C.J.J.D & J.M.F.C. Malkapur-Shahuwadi,

Date of order : 06/03/2018
Order signed by the presiding officer on : 06/03/2018
Order uploaded on : 14/03/2018